# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**रायगड जिल्ह्यात वन जमिनीवरील सामूहिक वनहक्क दावे मंजूर करण्याबाबत**

**(१) ४७०५ (०८-०४-२०१५). श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात वन जमिनीवरील सामूहिक वनहक्क दावे प्राप्त करुन ते मंजूर करुन घेण्यासाठी दिनांक १७ जानेवारी ते २१ फेब्रुवारी, २०१५ या कालावधीत विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विशेष मोहिमेचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या विशेष मोहिमेमध्ये काय निष्पन्न झाले ?

**श्री. विष्णु सवरा (०६-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ३ (१) अंतर्गत गौण वनोपजांचे सामूहिक वनहक्क दावे प्राप्त करुन घेण्यासाठी विशेष मोहिमेंतर्गत जनजागृती करुन तसेच विशेष कार्यशाळा आयोजित करुन घेण्यासाठी कालबध्द कार्यक्रम राबविण्यात आला आहे.

(३) सदर विशेष मोहिमेंतर्गत राबविण्यात आलेल्या कालबध्द कार्यक्रमानुसार रायगड जिल्ह्यातील ८ उपविभागामध्ये एकूण २२३ सामूहिक वनहक्क दावे उपविभागीय स्तरीय समितीकडे प्राप्त झाले आहेत.

**ठाणे येथील पोखरण क्र. २ मधील कॉन्कोर्ड डेव्हल्पर्सचे टोलेजंग गृहसंकुलाच्या बांधकामाबाबत**

**(२) ६३८६ (१०-०४-२०१५). श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील पोखरण क्र. २ मधील कॉन्कोर्ड डेव्हल्पर्सचे टोलेजंग गृहसंकुल बांधताना महानगरपालिका आणि म्हाडाच्या अधिका-यांनी दिलेल्या परवानग्या वादग्रस्त असल्याने याचा आर्थिक फटका तेथील घरे घेणा-यांना बसण्याची शक्यता असल्याचे दिनांक ७ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

म्हाडामार्फत दिनांक १६/०४/२०१० रोजी विकासकास दिलेले लेटर ऑफ इन्टेंट व दिनांक ०६/०५/२०१० रोजी ठाणे महानगरपालिकेस सदर भूखंडावर २.५० भूनिर्देशांक अनुज्ञेय करणे बाबत केलेली शिफारसपत्राच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेमार्फत दिनांक २४/०५/२०१० रोजी सदरचा अनुज्ञेय २.५० भूनिर्देशांक विचारात घेऊन विकास प्रस्ताव क्र.२००७/१०१अ यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

सदर गृहप्रकल्पातील इमारत क्र. २, ३ व ४ (भाग) यांना ठाणे महानगरपालिकेमार्फत दिनांक ०५/०३/२०१५ रोजी भागश: वापर परवाना देण्यात आला आहे. सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल असुन सदर याचिका प्रलंबित आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील आदिवासी आयुक्तालयातील सह आयुक्त यांच्या निलंबनाबाबत**

**(३) १०५१२ (२९-०७-२०१५). श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील आदिवासी आयुक्तालयातील सह आयुक्त श्री.ई.जी. भालेराव यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र मागणाऱ्या श्री. करीपुरे या आदिवासी व्यक्तीला शिवीगाळ केल्याची घटना मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.करीपुरे यांच्या कुटुंबियांना जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यास आदिवासी आयुक्त कार्यालय जाणीवपुर्वक टाळाटाळ करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जात पडताळणी प्रमाणपत्र मिळत नसल्याबाबत श्री. करीपुरे यांनी लेखी तक्रार केल्यामुळेच श्री. भालेराव, सह आयुक्त यांनी शिवीगाळ केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री. भालेराव यांच्या या कृत्यामुळे त्यांना निलंबित करण्याची घोषणा मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांनी केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, श्री भालेराव यांचेवर कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१६-०१-२०१७) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) होय.

(५) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी दिलेल्या प्राथमिक अहवालानुसार श्री.भालेराव यांच्याविरुध्दच्या तक्रारीत तथ्य आढळून आले नाही. त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची तसेच विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निकृष्ट बांधकामामुळे एका महिलेचा मृत्यू झाल्याबाबत**

**(४) १६५०५ (२८-०४-२०१६). प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे कारागृहाजवळच्या संरक्षण भिंतीलगतच्या फुटपाथवरुन चालत जात असताना जमीन खचल्याने एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुर्घटनेस निकृष्ट बांधकाम कारणीभूत असून कंत्राटदार, महापालिका अधिकारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, अशा प्रकारचे निकृष्ट बांधकाम करणाऱ्या कंत्राटदाराकडील सुरु असलेली कामे तात्काळ काढून घेऊन त्याला काळ्या यादीत टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर ठिकाणी कारागृहाच्या आतील बाजूने मलवाहिनी टाकण्याचे काम सुरु होते. सदर काम झाल्यानंतर सदर फुटपाथच्या भागात सुमारे १५ दिवसांपूर्वी माती भरणी करण्यात आलेली होती.

परंतु सदर ठिकाणी रस्त्याखालील भाग हा दलदलीचा असल्यामुळे व खाडीलगतचा परिसर असल्यामुळे तसेच खाडीच्या भरती ओहोटीच्या पाण्यामुळे फुटपाथच्या खालील भागातील माती खचल्यामुळे फुटपाथच्या खाली पोकळी निर्माण होऊन सदरची घटना घडल्याचे निदर्शनास येते. सदर घटना निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे घडलेली नसून हा निव्वळ अपघात असल्याने ठेकेदार किंवा अधिकारी यांचेवर कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) व (४) सदर ठिकाणाचे काम निकृष्ट असल्यामुळे सदरची घटना घडलेली नसून हा एक अपघात आहे. त्यामुळे ठेकेदार किंवा अधिकारी यांचेवर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात आलेली नाही. मात्र दुर्घटना घडल्याने गुन्हा नोंदविण्यात आला असून त्याबाबत ठाणे सत्र न्यायालयामध्ये दावा दाखल करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**ठाणे येथील जुन्या इमारतींच्या संरचनात्मक परिक्षणाबाबत**

**(५) १७२६७ (०३-०५-२०१६). श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा (जि.ठाणे) येथील बेकायदा इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर शहरातील ३० वर्षे जुन्या इमारतींचे संरचनात्मक परिक्षण करुन घेण्याची सक्ती संबंधित महानगरपालिकेने केली असली तरी दोन वर्षे उलटूनही अनेक इमारतींचे साधे नकाशेही उपलब्ध होत नसल्याने या इमारतींचा पाया किती खोल आहे याचा शोध लागत नसल्याने महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी संभ्रमात असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महापालिकने जाहीर केलेल्या इमारतींपेक्षा सुमारे दोन हजारांहून अधिक इमारतींचे अधिक पटीने संरचनात्मक परिक्षण करण्यात आले असून सुमारे दोन हजाराहून अधिक इमारती या अतिधोकादायक श्रेणीतील असल्या तरी या इमारतींच्या बांधकामाचे परिक्षण नेमके कशाच्या आधारे करायचे असा प्रश्न संरचनात्मक अभियंत्यांना पडला आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०१-२०१७) :** (१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६५(अ) नुसार ३० वर्षे पेक्षा जास्त आयुर्मान असलेल्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे बंधनकारक आहे.

सदर स्ट्रक्चरल ऑडीट करणेसाठी ठाणे महानगरपालिकेकडे नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर यांची यादी दिनांक ०४/०६/२०१६ रोजीच्या स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली असून त्यांचेमार्फत ३० वर्षापेक्षा जास्त आयुर्मान असलेल्या इमारतींचे संरचनात्मक परिक्षण संबंधित इमारत मालक/भोगवटदार यांनी करुन घ्यावयाचे आहे.

यासंदर्भातील नकाशे हे संबंधितांकडे उपलब्ध असणे अपेक्षित आहे.

(२) ठाणे महानगरपालिकेच्या अभियत्यांकडून दरवर्षी पावसाळ्यापूर्वी इमारतींचे सर्वेक्षण करुन सर्वेक्षणात आढळून आलेल्या धोकादायक इमारतींना नोटीसा बजावून स्थानिक वृत्तपत्रांत त्याची यादी प्रसिध्द करण्यात येते. यावर्षीही सदरची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

त्यानुसार एकूण ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण ३३३५ इमारती धोकादायक म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.

त्यामध्ये प्रवर्ग सी-१-९० इमारती, सी-२ए-१४८ इमारती, सी-२बी-१५३१ इमारती आणि सी-३-१५३३ इमारती आहेत. इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेसाठी १५२ स्ट्रक्चरल इंजिनिअर्सची नेमणूक केलेली असून त्यांच्याकडून संबंधित इमारत मालक/भोगवटादार यांनी स्ट्रक्चरल ऑडीट करुन घ्यावयाचे आहे. त्यानुसार प्राप्त स्ट्रक्चरल अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुनाडे, चिरनेर व कडापे (ता.उरण, जि.रायगड) आदी गावांना दरडी कोसळण्याचा धोका असल्याबाबत

**(६) १९३६८ (१९-०८-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यात रायगड जिल्हा भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेने केलेल्या सर्वेक्षणानुसार पुनाडे, चिरनेर व कडापे या तीन गावांना कमी जास्त प्रमाणात दरडी कोसळण्याचा धोका असल्याचे निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तीन गावातील किती लोकसंख्या बाधीत होणार आहे, खाडी किनारी असलेल्या गावांना चक्रीवादळाचा त्सुनामीचा धोका संभवणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०१-२०१६) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) रायगड जिल्ह्यातील दरड कोसळण्याचा धोका असलेल्या ८४ गावांच्या यादीत उरण तालुक्यातील पुनाडे, चिरनेर व कडापे या ३ गावांचा समावेश नाही.

---

## पिंपरी-चिंचवड करिता स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीबाबत

**(७) १९४२२ (१९-०८-२०१६). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड करिता स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करण्यासाठी एका समितीची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीच्या आतापर्यंत किती बैठका घेण्यात आल्या व सदर बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले,
(३) असल्यास, सदर निर्णयावर केव्हापर्यंत अंमलबजावणी करण्यात येईल वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०१६) :** (१), (२) व (३) पिंपरी-चिंचवड करिता स्वतंत्र पोलीस आयुक्तलायाची निर्मिती करण्यासाठी समितीची नियुक्ती करण्यात आलेली नाही. तथापि पिंपरी-चिंचवड येथे पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून शासनास प्राप्त झाला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इगतपुरी (जि. नाशिक) व नंदूरबार येथील क्रीडा केंद्राचे काम सुरु करणेबाबत**

**(८) १९४५० (१९-०८-२०१६). श्री.जयवंतराव जाधव, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४९३४ ला दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता दिनांक २४ ऑगस्ट, २००९ रोजी इगतपुरी (जि.नाशिक) येथे क्रीडा प्रबोधिनी व नंदुरबार येथे मध्यवर्ती क्रीडा केंद्र स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेवूनही माहे जून, २०१६ पर्यंत सदर प्रबोधिनीचे काम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रबोधिनीच्या बांधकामाचा आराखडा व अंदाजपत्रकांना राज्य क्रीडा समितीने मान्यता देवूनही शासनाच्या दिरंगाईमुळे सदर कामे सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनुसूचित जमातीच्या मुलांच्या क्रीडा गुणांना चालना देणे व क्रीडा विषयक सोईसुविधा उपलब्ध करून सदर क्रीडा केंद्राची कामे सूरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी इगतपुरी (जि.नाशिक) येथे प्रत्यक्षात क्रीडा प्रबोधिनीचे बांधकाम सुरु झाले नसल्याने सद्यस्थितीत विषयांकित क्रीडा प्रबोधिनीचे कामकाज तात्पुरत्या स्वरुपात नाशिक येथील विभागीय क्रीडा संकुलात सुरु आहे.

तसेच प्रकरणी क्रीडा प्रबोधिनीकरीता तज्ञ प्रशिक्षकांची सुलभ उपलब्धता व दळणवळणाची सोयी या बाबींचा विचार करता मुंबईजवळ मौजे कांबळगाव, जि.पालघर येथे नियमित क्रीडा प्रबोधिनी स्थापन करणेबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जासई (ता.उरण, जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या अंतर्गत राबविण्यात येणारा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उरण येथे राबविण्याबाबत**

**(९) १९४६६ (१९-०८-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील म्हातवली ग्रामपंचायत हद्दीत चारही बाजूने वसाहती झाल्या असून नागरिकीकरणातही वाढ झाली असून या ग्रामपंचायतीतील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंबंधीचा प्रश्न ऐरणीवर आला असून उरणमध्ये डम्पींग ग्राऊंडची व्यवस्था नसल्याने ग्रामपंचायत हद्दीतील कचरा मोठया प्रमाणात ओ.एनट.जी.सी.रोड लगत असणाऱ्या पाण्याच्या टाकीजवळ टाकण्यात येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जासई ग्रामपंचायतीच्या अंतर्गत राबविण्यात येणारा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उरणमध्ये राबविण्यात यावा या संदर्भातील प्रस्ताव सिडकोकडे दिनांक २ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास पाठविण्यात आला असून सिडकोकडून या प्रस्तावासंबंधी सकारात्मक कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०१७) :** (१), (२), (३) व (४) उरण तालुक्यातील सिडको हद्दीतील गावांमधील कचऱ्याची विल्हेवाट व प्रक्रिया करण्यासाठी जासई ग्रामपंचायतीच्या (ता.उरण, जि.रायगड) अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या धर्तीवर सहा स्थानांवर पाच मेट्रीक टन क्षमतेच्या (प्रतिदिन) नागरी घनकचरा व प्रक्रिया केंद्रांची स्थापना करण्याची कार्यवाही सिडकोमार्फत करण्यात येत आहे.

---

**भारत मेट्रीमोनी संकेतस्थळावरुन पुण्यातील महिलेची फसवणूक केल्याबाबत**

**(१०) १९४९१ (१९-०८-२०१६). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारत मेट्रीमोनी संकेतस्थळावरुन पुण्यातील महिलेला ३८ लाख २२ हजार रुपयांना फसवणाऱ्या नायजेरिअन टोळीला माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हे शाखेच्या सायबर सेलने अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या वर्षभरात अशा प्रकारे २५ महिलांकडून रुपये दोन कोटी घेऊन त्यांची फसवणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

पुणे शहर क्षेत्रात मॅट्रीमोनी या संकेतस्थळावरुन सन २०१५ मध्ये २ महिलांची रुपये ४९,८७,३२५/- रुपये घेऊन व सन २०१६ मध्ये ८ महिलांकडून रुपये ६१,७२,०१४/- रुपये घेऊन फसवणूक करण्यात आली. सदर प्रकरणी गुन्हे दाखल आहेत.

(३) सदर प्रकरणी १० गुन्हे दाखल असून त्यापैकी २ गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. एका गुन्ह्याचे दोषारोपत्र मा.न्यायालयात दाखल केले आहे. ६ गुन्ह्यांचा तपास चालू आहे व ३ गुन्ह्यांची "अ" वर्ग समरी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे शहरातील धोकादायक इमारतींबाबत**

**(११) १९६९८ (२३-०८-२०१६). श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने पावसाळयापूर्वी शहरातील धोकादायक इमारतींची यादी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऐन पावसाळयात गंभीर धोका आणि जिवित हानी टाळण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या नव्या धोरणानुसार महापालिकेने धोकादायक इमारतींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शहरात अशा किती अत्यंत धोकादायक इमारती आहेत, त्यांच्या पुनर्वसनाकरिता महापालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) शासन परिपत्रक दिनांक ०५/११/२०१५ अन्वये ठाणे महानगरपालिका हद्दीतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचे सी-१ (अतिधोकादायक, राहण्या अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या), सी-२बी (इमारत रिकामी न करता रचनात्मक दुरुस्ती करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या), सी-३ (इमारतीची किरकोळ दुरुस्ती प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या) प्रवर्गात वर्गीकरण करण्यात आले आहे.

सदर चार प्रवर्गापैकी सी-१ (अतिधोकादायक, राहण्या अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या) ९० इमारतींपैकी ७१ इमारती रिक्त करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित इमारतींबाबत कार्यवाही चालू आहे.

(३) ठाणे महानगरपालिका हद्दीत सी-१ प्रवर्गात ९० इमारती व सी-२ प्रवर्गात १४८ इमारती आहेत.

ठाणे महानगरपालिका हद्दीतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती निष्कासित केल्यानंतर रेंटल हौसिंग स्कीममध्ये सदनिका उपलब्ध करुन देण्यात येतात. आतापर्यंत अशा इमारतीमधील आजतागायत १९०८ बाधितांना रेंटल हौसिंग स्कीममध्ये सदनिका उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण"ची स्थापना करणेबाबत**

**(१२) १९७३६ (२३-०८-२०१६). ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिसांविरुध्दच्या तक्रारीबाबत "राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाची स्थापना मुंबईत करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राधिकरणाचे स्वरुप व कार्यकक्षा काय ठरविण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर प्राधिकरणाच्या कामास प्रत्यक्षात केंव्हा सुरुवात होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०१७) :** (१) राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्याविरुध्द प्राप्त तक्रारीबाबत चौकशी करण्यासाठी राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सदर प्राधिकरणाचे मुख्यालय, मुंबई येथे आहे.

(२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) मधील प्रकरण २ अ अंतर्गत कायम २२५ (२) अन्वये राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| (अ) उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश | अध्यक्ष |
| (ब) विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा, नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेला पोलीस अधिकारी | सदस्य |
| (क) नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती | सदस्य |
| (ड) राज्य शासनाच्या सचिव दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला एक निवृत्त अधिकारी | सदस्य |
| (इ) अपर पोलीस महासंचालक व महानिरिक्षकाचा दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला अधिकार | सदस्य सचिव |

कार्यकक्षा :- १) स्वत:हून किंवा एखादी बळी पडलेली व्यक्ती किंवा तिच्या कुटूंबातील सदस्य किंवा तिच्यावतीने इतर कोणतीही व्यक्ती, २) राष्ट्रीय किंवा राज्य मानवी हक्क आयोग आणि ३) पोलीस यांच्याकडून एखाद्या पोलीस अधिकाऱ्याविरुध्द १) पोलीस कोठडीतील मृत्यू, २) भारतीय दंड संहितेच्या कलम ३२० खाली व्याख्या केल्याप्रमाणे गंभीर दुखापत, ३) बलात्कार किंवा बलात्कार करण्याचा प्रयत्न, ४) विहित केलेली कार्यपध्दती न अनुसरता केलेली अटक किंवा स्थानबध्दता, ५) भ्रष्टाचार, ६) बलादग्रहण (खंडणी उकळणे), ७) जमीन किंवा घर बळकावणे आणि ८) ज्यामध्ये कायद्याच्या कोणत्याही तरतूदींचे गंभीर उल्लंघन

किंवा कायदेशीर प्राधिकाराचा दुरुपयोग याचा अंतर्भाव असेल अशी इतर कोणतीही बाब यासंबंधात प्राप्त झालेल्या तक्रारीवर चौकशी करणे तसेच कोणत्याही व्यक्तीस, प्राधिकरणाच्या मते, चौकशीच्या विषयवस्तुशी उपयुक्त, किंवा संबंध होऊ शकेल अश्या मुद्यावर किंवा बाबींवर माहिती पुरविण्यासाठी फर्मावणे.
(३) राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाचे कार्यालयीन कामकाज सुरु झाले आहे. मा.अध्यक्ष व सदस्य यांनी दिनांक ०२/०१/२०१७ रोजी पासून पदभार स्विकारला आहे.
(४) वरीलप्रमाणे.

---

**ठाणे येथे टाटा मेमोरियल संस्थेच्या सहकार्याने कर्करोग रुग्णालय उभारणेबाबत**

**(१३) १९८३४ (२३-०८-२०१६). ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४९९८ ला दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथे टाटा मेमोरियल संस्थेच्या सहकार्याने ठाणे महानगरपालिकेतर्फे कर्करोग रुग्णांसाठी गत २ वर्षापासून कर्करोग रुग्णालय उभारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संदर्भाधिन प्रश्नाचे उत्तरात नमूद केल्यानुसार सदर कर्करोग रुग्णालयासाठी निश्चित केलेल्या सुविधा भूखंडाप्रकरणी मा.न्यायालयात दाखल असलेल्या याचिका प्रकरणी न्यायालयाने निकाल दिला आहे काय,
(३) असल्यास, केव्हा व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) तसेच, राज्यात जिल्हास्तरावर कर्करोग रुग्णालय स्थापन करणेबाबत शासनाने घेतलेला धोरणात्मक निर्णय विचारात घेता प्रस्तुत प्रकरणी न्यायालयीन प्रक्रियेत प्रलंबित असलेल्या सदर सुविधा भूखंडाऐवजी अन्य एखादा भूखंड सदर रुग्णालयासाठी देता येणे शक्य आहे काय व त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०१-२०१७) :** (१) होय.
(२), (३) व (४) सदरहू याचिका उच्च न्यायालय यांच्याकडे प्रलंबित आहे. तसेच निश्चित केलेल्या सुविधा भूखंडाऐवजी अन्य भूखंड कर्करोग रुग्णालयाकरीता आरक्षित करण्याबाबतची शक्यता तपासण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करवीरपीठ कोल्हापूर संस्थांनास चालू मुल्यांकनानुसार द्यावयाच्या रक्कमेबाबत**

**(१४) १९८४८ (१६-०८-२०१६). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील करवीरपीठाची जागा (केसापूरपेठ) महापालिकेला भाडे पट्याने दिलेली असल्याने चालू रेडीरेकनर दराने मुल्यांकन करून अहवाल सादर करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी सन २०१५-१६ यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करवीरपीठाच्या जागेचे चालू रेडीरेकनर दराने मुल्यांकन, जागेची स्थिती, अटी शर्ती, करारनामा याबाबतचा सविस्तर अहवाल मुख्यमंत्री महोदयांकडे सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, करवीरपीठास चालु मुल्यांकनाप्रमाणे किती रक्कम देणे बाकी आहे, तसेच किती मुदतीत सदरील रक्कम देण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१७) :** (१), (२) व (३) श्री.स्वामी जगद्‌गुरु शंकराचार्य करवीर पीठ यांच्या केसापूर पेठ या मिळकतीपोटी सदर संस्थेस करवीर तालुका ट्रेझरीमधून द्यावयाच्या इ.स. १८७४ साली निर्धारित केलेल्या रुपये १८६.७० प्रतिवर्षाच्या मोबदल्यामध्ये कालानुरुप वाढ करुन मिळण्याबाबतची सदर संस्थेची मागणी विचारात घेता सदर पीठास प्रतिवर्षी देय असलेल्या मोबदल्याच्या रकमेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या विचारार्थ सादर करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २५/०५/२०१६ च्या बैठकीत निदेश दिले होते. त्यानुषंगाने सर्व कायदेशीर बाबी विचारात घेऊन त्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला असता मंत्रिमंडळाने उक्त मोबदल्याच्या रकमेत वाढ करण्यास मान्यता दिली असून सदर वाढीव मोबदल्यापोटी दिनांक ०१ एप्रिल, २००१ ते ३१ मार्च, २०१७ च्या कालावधीसाठी रुपये १६.६० लाख मात्र सदर संस्थेस प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

---

## अकोला, बुलढाणा, वाशिम शहराच्या हद्दवाढीबाबत

**(१५) २०१२० (२३-०८-२०१६). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला, बुलढाणा व वाशिम शहराच्या हद्दवाढीबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अकोला, बुलडाणा व वाशिम यांचेकडून शासनास प्राप्त झाला आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर प्रस्तावानुसार उक्त शहरांची हद्दवाढीची अंमलबजावणी केव्हापासून होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०१-२०१७) :** (१) (अ) आयुक्त, अकोला महानगरपालिका यांचेकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने, दिनांक ३०/०८/२०१६ रोजी प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेन्वये हद्दवाढ अंमलात आलेली आहे.
(ब) बुलढाणा नगरपरिषदेच्या हद्दवाढीबाबत जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडून त्रुटींचा अहवाल मागविण्यात आलेला आहे.
(क) वाशिम नगरपरिषदेच्या हद्दवाढीसंदर्भात असा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त नाही.

(२) (अ) बुलढाणा नगरपरिषदेच्या हद्दवाढीबाबत जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडून त्रुटींचा अहवाल मागविण्यात आलेला आहे.

(ब) वाशिम नगरपरिषदेच्या हद्दवाढीसंदर्भात असा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त नाही.

(३) व (४) (अ) दिनांक ३०/०/२०१६ च्या अधिसूचनेन्वये अकोला महानगरपालिकेचे हद्दवाढ अंमलात आलेली आहे.

(ब) बुलढाणा व वाशिम नगरपरिषदेच्या हद्दवाढीबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे मलकापूर (ता.जि.अकोला) येथील म्हाडाने संपादित केलेली जमीन श्रीमती कोठारी यांना परत करण्याबाबत**

**(१६) २०१३२ (२४-०८-२०१६). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मलकापूर (ता.जि.अकोला) येथील म्हाडाने संपादित केलेली सर्व्हे नं २४/२ मधील ४२४५ चौ.मी जमीन म्हाडाकडून श्रीमती शकुंतला कोठारी यांना परत मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सातत्याने मा.मुख्यमंत्री व संबंधित मंत्री महोदयांशी तसेच विभागाशी पत्रव्यवहार करून बैठका घेऊन तसेच प्रत्येक अधिवेशनात विविध आयुधांद्वारे प्रकरण उपस्थित करुनही अदयाप आश्वासनापलिकडे काहीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, तद्‌नुसार उपरोक्त जमीन म्हाडाकडून श्रीमती कोठारी यांना परत करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२८-१२-२०१६) :** (१), (२) व (३) मौजे-मलकापूर, ता.जि.अकोला येथील सर्व्हे क्र. २४/२ मधील श्रीमती शकुंतला कोठारी यांच्या मालकीची, २० एकर २८ गुंठे जमीन भुसंपादन अधिनियम १८९४ अन्वये सन १९७१ मध्ये संपादित करण्यात आलेली असून संपूर्ण जमिनीचा मोबदला जमीन मालकास देण्यात आलेला आहे. संपादीत केलेल्या एकूण जमिनीपैकी १९ एकर १६ गुंठे जमिनीवर विविध उत्पन्न गटाकरिता मंडळातर्फे गृहनिर्माण योजना राबविण्यात आलेल्या आहेत.

उर्वरित ४२४५ चौ.मी.पैकी १८२१ चौ.मी. ही जमीन रस्त्याच्या बदल्यात श्रीमती कोठारी यांना देण्यात आलेली आहे. शिल्लक २४२४ चौ.मी. भूखंडामधून ७४२.५७ चौ.मी. गल्ली सोडण्यात आलेली आहे. वापरायोग्य १९५१.४३ चौ.मी. इतका भूखंड शिल्लक राहतो. यावर महानगरपालिकेच्या आरक्षणाप्रमाणे व्हेजीटेबल मार्केट आराखडा मंजूर केलेला आहे. तसेच संपादित केलेली जमीन परत देता येत नसल्यामुळे जमीनमालक श्रीमती कोठारी यांच्याबरोबर संयुक्तिक योजना (Joint Venture) करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यात आला असता प्राधिकरणाच्या दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ च्या बैठकीत सदर प्रस्ताव नाकारण्यात आला आहे.

---

**पिंपरी (जि. पुणे) येथील फोर्स मोटर्स कंपनीमधील कर्मचाऱ्यांचा वेतन करार प्रलंबित असल्याबाबत**

**(१७) २०२३० (२३-०८-२०१६). श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी (जि. पुणे) येथील फोर्स मोटर्स कंपनीमधील कर्मचाऱ्यांचा गत १८ वर्षापासून वेतन करार प्रलंबित असल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी आणि ग्रॅच्यूईटी बाबतचे मोठे आर्थिक नुकसान होत असून तुटपुंजी रक्कम घेवून अनेक कर्मचाऱ्यांना निवृत्त व्हावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तद्नुसार निवृत्त कर्मचाऱ्यांना वेतन करारानुसार आर्थिक लाभ देण्याचे दृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-०१-२०१६) :** (१) मे.फोर्स मोटर्स लि., पुणे या कंपनीतील कामगारांच्या वेतनाबाबतचा करार दिनांक ३१/१२/२००३ रोजी संपुष्टात आल्यानंतर कंपनीतील दोन संघटनांच्या मान्यतेबाबतच्या विवादामुळे कामगारांचा वेतन करार झाला नव्हता. तद्नंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने या विवादाबाबत दिनांक ०१/१२/२०१५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार भारतीय कामगार सेना ही मान्यताप्राप्त संघटना ठरल्याने व्यवस्थापनाने त्यांचेशी दिनांक ०४/०४/२०१६ रोजी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा उल्लेख न करता केवळ कंपनीच्या पटावर असलेल्या कामगारांच्या वेतनवाढी व इतर सेवाशर्तीबाबतचा करार केला आहे. त्यामुळे या करारापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कामगारांना वेतनकरारानुसार कोणताही लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे.

(२) होय, उक्त कंपनीतील कामगारांच्या वेतनाबाबतचा करार दोन संघटनांमधील मान्यतेबाबतच्या विवादामुळे बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यानंतर मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०३/११/२०१५ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत उभयपक्षात सहमती होवून कामगारांना रुपये १४,०००/- ची दरमहा वेतनवाढ देण्याबाबत सहमती झाली होती. तद्नंतर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०१/१२/२०१५ च्या निर्णयास अनुसरुन व्यवस्थापनाने भारतीय कामगार सेना या मान्यताप्राप्त संघटनेशी दिनांक ०४/०४/२०१६ रोजी वेतन व इतर सेवाशर्तीबाबतचा करार स्वाक्षरित केला आहे. सदरहू वेतन कराराचा लाभ कंपनीच्या पटावरील कामगारांना झाला असून या करारामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सद्यस्थितीत कोणताही आर्थिक लाभ झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपीटमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत**

**(१८) २०३३५ (१९-०८-२०१६). श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यातील चिंचावाड, आघारसह गाळणे, चिंचवे, हरणशिकार भागात वादळी वाऱ्यासह गारपीट झाल्याने कांदा, डाळिंब व आंबा पिकांचे नुकसान झाल्याचे दिनांक ४ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नुकसान भरपाईंचा पंचनामा करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोयना धरणाजवळ भुकंपाचे धक्के बसल्याबाबत**

**(१९) २०३८८ (१९-०८-२०१६). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना धरणाजवळ माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान चार दिवसात सहा भुकंपाचे तीव्र धक्के बसले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०९-०१-२०१७) :** (१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरणी तहसीदार पाटण यांनी चौकशी केली असून सदर भुकंपांमध्ये कोणतीही जिवित वा वित्त हानी झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद महावितरण कंपनीच्या परिमंडळ कार्यालयात कुलर बसवून पैशाचा अपव्यय केल्याबाबत**

**(२०) २०५४९ (१६-०८-२०१६). श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महावितरण कंपनीच्या परिमंडळ कार्यालयात ४३ कुलर भाड्याने बसविले असुन या कुलरच्या भाड्यापोटी दिड महिन्याला एक कुलरचे तीन हजार रूपये अदा करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अशाप्रकारे पैशाचा अपव्यय करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-१२-२०१६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) अधिक्षक अभियंता, ग्रामीण मंडळ, औरंगाबाद यांनी रितसर निविदा काढून, सर्वात कमी दराने प्राप्त निविदा अंतिम करुन, दिड महिन्याच्या कालावधीसाठी भाडे तत्वावर ४३ कुलर्स बसविले होते. नियमानुसार कार्यवाही केली असल्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य आपत्ती व्यवस्थापन धोरणांची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(२१) २०५५८ (१९-०८-२०१६). श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य आपत्ती व्यवस्थापन धोरणाच्या नविन आराखडयाला शासनाने मान्यता दिली असून आपदग्रस्तांना द्यावयाच्या किमान सहाय्याबाबत राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे निकष आता राज्यातही लागू होणार असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०१-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) आपदग्रस्तांना द्यावयाच्या किमान सहाय्याबाबत राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे निकष राज्यातही लागू करण्याबाबतची अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**विडा (ता.केज, जि.बीड) गावातील मुलाचा विहिरीत पडून मृत्यु झाल्याच्या घटनेबाबत**

**(२२) २०५६९ (१९-०८-२०१६). श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विडा (ता.केज, जि.बीड) गावात राहणारा १२ वर्षीय सचिन कैंगार हा मुलगा विहिरीतील पाणी काढण्याकरिता गेला असता विहिरीत पडून त्याचा मृत्यू झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुलाच्या पालकांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाने नैसर्गिक आपत्तीमध्ये चक्रीवादळ, भूंकप, आग, पूर, त्सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, बर्फखंड कोसळणे, टोळधाड, दुष्काळ, ढगफुटी व कडाक्याची थंडी या आपत्तींचा समावेश केला आहे. सदर आपत्तीमध्ये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत अनुज्ञेय आहे. विहिरीत पडून मृत्यू झाल्याची बाब नैसर्गिक आपत्तीमध्ये दिनांक ३० जानेवारी, २०१४ व दिनांक १३ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मोडत नसल्याने आर्थिक मदत अनुज्ञेय नाही.

तथापि, मृत मुलाच्या कुटूंबियांना राजीव गांधी विद्यार्थी अपघात विमा योजनेतून आर्थिक मदत मिळण्यासाठी शिक्षणाधिकारी, बीड यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**१९७६ च्या सिलिंग ॲक्टनुसार संपादित केलेल्या जमिनी मुळ मालकांना परत देण्याबाबत**

**(२३) २१८५८ (१६-०८-२०१६). श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन १९७६ च्या सिलिंग ॲक्टनुसार अधिक असलेल्या परंतु शासनातर्फे संपादीत केलेल्या जमिनी मूळ मालकांना परत करून बांधकाम व्यावसायीक त्या जमिनी परत मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात न्यायालयात अनेक याचिका दाखल होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा पध्दतीने संपादीत करण्यात आलेल्या जमिनी मुळ मालकांना परत देण्याकरीता कायद्यात दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१७) :** (१), (२) व (३) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ निरसित होण्यापूर्वी अधिनियमाच्या कलम १०(३) व १०(५) खाली कार्यवाही करुन शासनाने संपादित केलेले क्षेत्र शासनाच्या ताब्यात असून असे क्षेत्र जमीनधारकास परत करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि अशा संपादीत क्षेत्राबाबत मा.न्यायालयात दाखल याचिकांमध्ये शासनाची संपादनाची कार्यवाही योग्य असल्याबाबत शपथपत्राद्वारे मा.न्यायालयासमोर बाजू मांडण्यात येत असते. परिणामी संपादीत जमिनी मूळ मालकांना परत करण्याचा वा त्याकरीता कायद्यात दुरुस्ती करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्रँट रोड (मुंबई) येथील शितल इस्टेटच्या घरमालकावर कारवाई करणेबाबत**

**(२४) २१९०१ (२३-०८-२०१६). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रँट रोड (मुंबई) येथील शितल इस्टेटच्या घरमालकाच्या विरोधात गिरगाव विभागाचे सहायक पोलीस आयुक्त यांना रहिवाश्यांच्या तक्रारीचे निवेदन दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास व तत्पूर्वी अनेकवेळा दिले असून पोलिसांमार्फत कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१२-२०१६) :** (१) व (२) सदरहू प्रकरणी दिनांक ०१/१२/२०१४ रोजी तक्रार प्राप्त झाली होती. सदर घटनेच्या अनुषंगाने वारंवार तक्रारी सादर करण्यात आल्या आहेत. त्याबाबत चौकशी करण्यात आली असता अर्जदारांच्या नातेवाईकांनी नमूद गुन्ह्यातील फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण केली असल्याचे दिसून आल्याने तक्रारीमध्ये तथ्य दिसून आले नाही. याउलट तक्रारीच्या विपरीत परिस्थिती असल्याचे निदर्शनास आले असून, अर्जदार महिलेस तसे कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण भागातील ग्रंथालयात काम करणाऱ्या**
**कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करण्याबाबत**

**(२५) २२०१९ (२३-०८-२०१६). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील अशासकीय संस्थांनी चालविलेल्या ग्रंथालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन वाढ देण्यासंबंधी मा. शालेय शिक्षण मंत्र्यांकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०१-२०१७) :** (१) होय. दिनांक ०६/०५/२०१६ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्या व इतर समस्या या संदर्भात दिनांक १४/०७/२०१६ रोजी मा.मंत्री, उ. व. तं. शि. यांचेकडे बैठक झाली असून त्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खतरगांव, वरुडा व शेंदुरजना बाजार सेवा सहकारी (ता.तिवसा, जि.अमरावती) या तिन्ही संस्थांना अमरावती जिल्हा मध्यवर्ती बॅंकेने कर्ज देण्यास नकार दिल्याबाबत**

**(२६) २२३३४ (१९-०८-२०१६). श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खतरगांव, वरुडा व शेंदुरजना बाजार सेवा सहकारी (ता.तिवसा, जि.अमरावती) या तिन्ही संस्थेतील सभासदांनी त्यांचेकडील मागील नियमित कर्जाचा भरणा करूनही सन २०१६-१७ च्या खरीप हंगामासाठी या संस्थातील ७ ते ८ सभासदांना कर्ज मंजूर करण्यास अमरावती जिल्हा मध्यवर्ती बॅंकेने नकार दिल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती यांना दिनांक १४ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१३-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अमरावती कार्यालयाने दिनांक २३/५/२०१६ रोजी जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्था अमरावती यांना संबंधित संस्थांना कर्जवाटप करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेने सेवा सहकारी संस्था सातरगाव, वरुडा, शेंदुरजना बाजार या तीनही संस्थांच्या पात्र तीन सभासदांना दिनांक १०/६/२०१६ रोजी पिक कर्ज मंजूर केले आहे. सदर सभासदांनी एकूण रुपये १८६७००/- रक्कम बॅंकेतून उचल केलेली आहे. तसेच उर्वरित ३ पात्र सभासदांना पिक कर्ज वाटप करण्यास दिनांक ८/७/२०१६ रोजी मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर सभासदांना एकूण रुपये ११९९१०/- इतके कर्ज वाटप करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्याकरिता जिल्हा नियोजन समितीमार्फत महापालिका व नगरपालिकेसाठी जादा निधीची तरतूद करणेबाबत**

**(२७) २२५४६ (२४-०८-२०१६). श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून शेकडो कोटी रुपयांची तरतूद करण्यात येते मात्र महापालिकेसह नगरपालिकांसाठी केवळ १३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तरतूद नाममात्र असल्याने महापालिका व नगरपालिका क्षेत्रातील विकास कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त क्षेत्रातील विकास कामे पूर्णक्षमतेने होण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत महापालिका व नगरपालिकेसाठी जादा निधीची तरतूद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१७) :** (१) अहमदनगर जिल्ह्याच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील रुपये ३५६.५९ कोटी जिल्हा नियोजन तरतूदीपैकी रुपये १३ कोटीची तरतूद एक महानगरपालिका, दहा नगरपरिषदा व पाच नगरपंचायती यांचेकरिता करण्यात आली आहे.
(२) व (३) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील विकास कामांना जिल्हा नियोजन तरतूदी व्यतिरिक्त राज्य शासन व केंद्र शासनाच्या विविध योजनामधून निधी उपलब्ध करण्यात येत असतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे देवणी बु. (जि. लातूर) येथील हेक्टर गावठाण जागेबाबत**

**(२८) २२५६६ (१६-०८-२०१६). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे देवणी बु. (जि. लातूर) येथील सर्वे नं. २२६/२३८/१ मधील २ हेक्टर गावठाण विस्तारासाठी राखीव असलेली जमीन बेघर व विस्तापित महिला कुटूंब प्रमुखांच्या नावे घरासाठी जागा प्रस्तावित करण्याबाबतची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, सचिव (महसूल व वन विभाग), विभागीय आयुक्त (औरंगाबाद), जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी (जि.लातूर), तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (जि.लातूर) यांच्याकडे दिनांक १३ जुलै, २०१५ पासून वारंवार तसेच दिनांक ७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार बेघर विस्तापित कुटूंब प्रमुखाच्या नावे घरासाठी जागा प्रस्तावित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१७) :** (१), (२) व (३) ग्रामपंचायत देवणी बु., जि.लातूर येथील ग्रामसभेने केलेल्या ठरावानुसार १६४ गरजू लाभार्थ्यांसाठी उपविभागीय अधिकारी, उदगीर यांचेकडून मौजे देवणी बु. येथील सर्वे नं. २२६/२३८/१ मधील २ हेक्टर एवढया खाजगी जमिनीचे भूसंपादन करण्यात आले. या जागेत ३३X३३ चौ.फुट क्षेत्रफळाचे एकूण १२५ भूखंड (प्लॉट) तहसिलदार, उदगीर यांनी तयार केले. प्रस्तावित १६४ लाभार्थ्यांपैकी तपासणीत फक्त २६ लाभार्थी पात्र असल्याची खात्री झाल्याने २६ लाभार्थ्यांच्या यादीस उपविभागीय अधिकारी, निलंगा यांची मान्यता घेण्यात आली असून सदर २६ लाभार्थ्यांकडून आवश्यक नजराणा रक्कम वसूल करुन त्यांना भूखंड वाटप करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

दरम्यानच्या कालावधीत श्रमीक हक्क अभियान महाराष्ट्र, संलग्न नॅशनल दलित मानवी हक्क अभियान या संघटनेने जिल्हाधिकारी, लातूर यांच्या कार्यालयात सादर केलेल्या निवेदनातील ७५ बेघर व विस्थापित लाभार्थ्यांच्या अर्जासह एकूण २४९ अर्ज भूखंड वाटपासाठी तहसिलदार, देवणी बु. यांच्याकडे प्राप्त झाले आहेत. सदर अर्जांची तपासणी तहसिलदार,

देवणी बु. यांनी स्थापित केलेल्या विशेष पथकाद्वारे करण्यात येत असून त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या यादीस मान्यता देवून भूखंडाचे वाटप करण्याचे संकल्पित आहे.

---

**राजापूर (जि. रत्नागिरी) नगरपरिषदेंतर्गत येणाऱ्या महत्वाच्या रस्त्याची व स्मशानभूमीची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(२९) २२९५९ (२३-०८-२०१६). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि. रत्नागिरी) नगरपरिषदेंतर्गत येणाऱ्या महत्वाच्या रस्त्याची व स्मशानभूमीची कामे अर्धवट असून ते पूर्ण करण्यासाठी नगरपरिषद दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजापूर नगरपरिषदेस शासनाकडून मिळालेल्या रस्ते अनुदानाचे रुपये २ कोटी व वैशिष्ट्यपूर्ण योजनेच्या रुपये सव्वा कोटी निधीमधून रस्त्यांची व स्मशानभूमीची कामे होणे अपेक्षित असताना सदरहू निधी चिंचबांध-कौढेतड पुलाच्या कामास वापरण्याच्या विचारात नगरपरिषद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निधी इतर कामास वापरल्यास शहरातील रस्त्यांची व स्मशानभूमीची कामे प्रलंबित असल्याने याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) चिंचबांध-कौढेतड पुलाचे काम हे विहित मान्यतेने करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागातील कर्मचाऱ्यांना सब ऑफिसरचे प्रशिक्षण देण्याबाबत**

**(३०) २३१९५ (२३-०८-२०१६). श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागामध्ये एकूण २४० कर्मचारी कार्यरत असून यापैकी केवळ ६० कर्मचाऱ्यांचे सब ऑफिसरचे प्रशिक्षण पूर्ण झाले असल्याची बाब माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय दारुगोळा भंडारातील शस्त्रगारांची अद्ययावत माहिती सब ऑफिसरच्या प्रशिक्षणात दिली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहराजवळ संरक्षण विभागाचे चार मोठे केंद्रे कार्यरत असल्यामुळे नागपूर महानगरपालिकेंतर्गत असलेल्या अग्निशामक दलातील सर्वच कर्मचाऱ्यांना सब ऑफिसरचे प्रशिक्षण देण्याची योजना शासन स्तरावर प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०१-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील विविध कार्याकरिता २३७ कर्मचारी कार्यालय असून, त्यापैकी प्रत्यक्ष अग्निशमन कार्यासाठी १८६ कर्मचारी उपलब्ध आहेत. यापैकी ६२ कर्मचाऱ्यांनी सब ऑफीसर पाठ्यक्रम राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथून उत्तीर्ण केलेला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

दारुगोळा व भंडार व शस्त्रगार येथील अग्निशमन कार्यासंबंधी अद्ययावत माहिती ही स्टेशन ऑफीसर व डिव्हीजनल फायर ऑफीसर या पाठ्यक्रमात दिली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांस एकाही संशयितावर गुन्हा सिध्द करता न आल्याबाबत

**(३१) २३२८२ (२४-०८-२०१६). डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागात यावर्षीच्या कारवाईत एकाही संशयितावर गुन्हा सिध्द करता आला नसल्यामुळे यावर्षी २९ संशयितांची निर्दोष मुक्तता करण्यात आली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध प्रकरणांमध्ये सापळा रचताना एकाच अधिकाऱ्याचा वापर करण्यात येतो त्यामुळे संशयित सुटतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाचखोरीचे गुन्हे सिध्द व्हावेत यासाठी सबळ पुरावे गोळा करावेत यासाठी शासनाने संबंधित विभागाला स्पष्ट सूचना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०१७) :** (१) मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागात यावर्षी माहे मे, २०१६ पर्यंत केलेल्या कारवाईत एकूण ४५ गुन्हे नोंद करण्यात आले असून, त्यापैकी २ गुन्ह्यामध्ये मा.विशेष न्यायालय, मुंबई येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हे न्यायप्रविष्ट आहेत. उर्वरित ४३ गुन्हे हे तपासधीन आहेत.

सन १९९६ ते २०१४ या कालावधीत दोषारोपपत्र दाखल केलेल्या गुन्ह्यांमध्ये मा.विशेष सत्र न्यायालयाने जानेवारी ते मे, २०१६ या कालावधीत एकूण २९ केसमध्ये निकाल दिलेला असून त्यामधील ४४ आरोपींपैकी ३८ आरोपींना दोषमुक्त केलेले असून ६ आरोपींना गुन्ह्यातून मुक्त केलेले आहे.

(२) हे खरे नाही.

सापळा कारवाईमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागामधील सर्व अधिकारी कर्मचारी क्रमाक्रमाने सापळा कारवाईसाठी नेमले जातात.

(३) व (४) आतापर्यंत मा.न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाचा अभ्यास करुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून दोषासिध्दीच्या प्रमाणात वाढ होण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

१) लाचेच्या सापळा प्रकरणात आरोपी लोकसेवक व तक्रारदार यांच्यात लाचेच्या व्यवहारासंबंधी होणारे संभाषण डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येवून ते तपासणीसाठी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे पाठविण्यात येते. हे संभाषण संबंधित तपासी अधिकारी स्वत: करतात.

२) खटल्यातील दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी दोषारोप गुणवत्ता तपासणीकरीता गृह विभाग शासन निर्णय दिनांक २०/०५/२०१५ अन्वये संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे.

३) संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचा ध्वनीमुद्रण तपासणी अहवाल कलम २९३ फौजदारी दंड प्रक्रिया संहितीमध्ये नमूद असलेल्या सहायक संचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांची पदनाम व सहीने प्राप्त करुन घेण्याबाबत कळविण्यात आले आहे व त्याप्रमाणे कार्यवाही होत आहे.

४) सर्व तपासी अधिकरी व त्यांचेसोबतचे अंमलदार यांना न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे डिजिटल व्हाईस रेकॉर्डर हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

५) लाचेचा सापळा गुन्ह्याच्या पंचनामादरम्यान त्रुटी राहु नयेत व त्यांचा प्रतिपक्षास फायदा होऊ नये म्हणून विविध कार्यालयीन आदेश/परिपत्रके काढण्यात आली आहेत.

६) पैरवी अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली असून ते खटल्यादरम्यान पंच व साक्षिदारांना उपस्थित ठेवून मार्गदर्शन करतात.

---

**ठाणे-मुलुंड स्टेशन दरम्यानच्या प्रस्तावित विस्तारीत रेल्वे स्थानकास मनोरुग्णालयाच्या ताब्यातील जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३२) २३३१७ (२४-०८-२०१६). श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक १४९९७ ला दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-मुलुंड दरम्यान प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या जागेवर नवीन विस्तारीत रेल्वे स्थानकाला मध्ये रेल्वे प्रशासनाची मंजूरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मनोरुग्णालयाच्या जमिनीची मालकी राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडे असल्याने सदर जागा रेल्वेला विनामुल्य मिळावी अशी अट रेल्वे प्रशासनाने घातली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मनोरुग्णालयाची जमीन प्रस्तावित रेल्वे स्थानकास देण्याबाबत रेल्वे प्रशासनाने राज्य शासनास मागणी केली आहे काय व सदर मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०१-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) उक्त मनोरुग्णालयाची जमीन प्रस्तावित रेल्वे स्थानकास देण्याबाबत ठाणे महानगरपालिकेमार्फत सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मागणी करण्यात आली आहे.

सदरचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडे विचाराधीन आहे.

---

**राज्यातील गृहनिर्माण योजनेकरिता नियम तयार करण्याबाबत**

**(३३) २३३२५ (२४-०८-२०१६). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गृहनिर्माण योजनेकरिता नियम तयार करण्यासाठी माजी अप्पर सचिव श्री.गौतम चटर्जी यांचे अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या एका सदस्यीय समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, या अहवालाचे स्वरूप काय आहे व त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१७-०१-२०१७) :** (१), (२), (३) व (४) संसदेने अधिसंमत केलेला The Real Estate (Regulation & Development) Act, २०१६ केंद्र शासनाने दिनांक २६/०३/२०१६ रोजी अधिसूचित केला आहे. The Real Estate क्षेत्रात ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे, त्यांच्या तक्रारींचा त्वरेने निपटारा करण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण नियामक प्राधिकरण व अपिलीय न्यायाधिकरणाची स्थापना करणे उपरोक्त अधिनियमात अंतर्भूत आहे. त्याअनुषंगाने राज्यांमध्ये सदर अधिनियम अंमलात आणण्याच्या दृष्टीने नियम ८४ खाली नमूद केलेल्या प्रत्येक मुद्याचा अभ्यास करुन राज्य शासनातर्फे तयार करण्यात येणाऱ्या नियमांकरीता सूचना करण्यासाठी श्री.गौतम चॅटर्जी, भा.प्र.से. (निवृत्त) यांना विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने त्यांचेकडून प्रारुप नियम प्राप्त झाले असून ते शासनाच्या विचाराधीन आहेत.

---

**आदिवासी क्षेत्रातील नगरपालिकांना राज्यस्तरीय योजनांसाठी**
**लोकवर्गणीची अट शिथिल करण्याबाबत**

**(३४) २३४०६ (२४-०८-२०१६). श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी क्षेत्रातील नगरपालिकांना राज्यस्तरीय योजनांसाठी लोकवर्गणीची अट शिथिल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, नंदूरबार नगरपरिषदेच्या प्रस्तावासाठी किती निधी मंजूर करण्यात आला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२७-१२-२०१६) :** (१) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील नगरपरिषद / नगरपंचायतींचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियानांतर्गत मंजूर करण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधांचे प्रकल्प तातडीने पूर्ण होण्यासाठी या नगरपरिषदांची/नगरपंचायतींची स्वहिश्श्याची रक्कम यापुढे आदिवासी उपयोजनेतून (TSP) उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने दिनांक ९ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.
(२), (३) व (४) सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने नंदुरबार नगरपरिषदेच्या रस्ते विकास व भुयारी गटार या दोन प्रकल्पासाठी आवश्यक स्वहिस्सा निधी रुपये २२.१२ कोटी इतक्या रकमेची पुरवणी मागणी सन २०१६ च्या आगामी अधिवेशनात विधानमंडळापुढे सादर करणेबाबत प्रस्तावित करण्यात आली आहे.

---

**राज्य शासनाने नोकर भरतीत ३० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(३५) २३५०३ (११-११-२०१६). श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामराव वडकुते, श्री.कपिल पाटील, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची सुमारे ९० हजार पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सन १९८५ पासून नोकर भरती बंद असून शासकीय कर्मचा-यांना अतिरिक्त कामाचा ताण पडत असताना शासनाने नोकर भरतीत ३० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नोकर भरती कपात रद्द करणे, राज्य लोकसेवा आयोगांच्या जागांची भरती करणे, कृषि सेवक पदांच्या भरतीत झालेल्या गैरप्रकारांची चौकशी करणे व इतर मागण्या प्रकरणी परभणीसह राज्यातील अनेक विद्यार्थ्यांनी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शने केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पदे रिक्त असल्याने अधिकारी/कर्मचारी यांना अतिरिक्त काम करावे लागते त्याशिवाय शासकीय कामे विहित वेळेत होत नसल्याने अधिकारी/कर्मचारी यांची पदे भरणेबाबत व उक्त प्रश्न भाग (३) च्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-११-२०१६) :** (१) होय.

(२) नाही. तथापि, वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १४/०१/२०१६ अन्वये केवळ गट ड वर्गाच्या मंजूर पदांपैकी २५ टक्के पदे निरसित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३), (४) व (५) शासनाने नोकर भरतीत ३० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतलेला नाही. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून भरती प्रक्रिया चालू आहे. आयोगाकडून सन २०१७ चे परीक्षेचे वेळापत्रक देखील जाहिर करण्यात आले आहे. कृषि सेवक पदांच्या परीक्षेच्या निकालासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कृषि सेवक भरती प्रक्रिया सखोल चौकशीपर्यंत स्थगित करण्यात आली आहे. चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## करंजा ते रेवस या बंदरादरम्यान अंतर्गत जलवाहतूकीसाठी सुरु करण्यात आलेल्या रो-रो सेवा प्रकल्पाबाबत

**(३६) २३५५१ (११-११-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजा (ता.उरण, जि.रायगड) हे कोकण किनारपट्टीवरील महत्वाचे मच्छीमार व प्रवासीबंदर असून करंजा ते रेवस या बंदरादरम्यान सुमारे १० कोटी रूपये खर्च करून अंतर्गत जलवाहतूकीसाठी महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाच्या माध्यमातून रो-रो सेवा प्रकल्प सुरू करण्याच्या दृष्टीने काम सुरू असून या प्रकल्पाच्या निर्मिती प्रक्रियेतील अनेक बेकायदा बाबी माहिती अधिकारांतर्गत मागविलेल्या माहितीत निदर्शनास आल्याने या प्रकल्पाचे काम त्वरीत थांबविण्याची मागणी करंजा मच्छीमार संस्थेचे संचालक श्री.हेमंत गौरीकर यांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.बंदरे मंत्री, किनारा अभियंता यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाच्या कामाचे कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) ठेकेदार आर.बी.चव्हाण यांना दिलेले असताना आजमितीस कामाची बिले कुळगाव-बदलापूर येथील मे.अर्जून अर्थमूवर्स या कंपनीच्या नावे काढण्यात येत असल्याचा प्रश्नही त्यांनी सदरहू तक्रारीत केला असून या जेटीच्या कामाची चौकशी करण्याची मागणीही केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, करंजा मच्छीमार संस्थेचे संचालक श्री.हेमंत गौरीकर यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-११-२०१६) :** (१) होय.

(२), (३) व (४) अंतर्गत जलवाहतूक प्रकल्पांतर्गत करंजा येथे रो-रो सेवेच्या अनुषंगाने रो-रो जेट्टी बांधण्याची दोन कामे खालीलप्रमाणे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत हाती घेण्यात आलेली आहेत.

१. करंजा येथे अंतर्गत जलवाहतुक प्रकल्पातील जमिनीकडील भागात (On Shore) काम करणे.

२. करंजा येथे अंतर्गत जलवाहतुक प्रकल्पातील समुद्राकडील भागात (Off Shore) काम करणे.

करंजा On Shore च्या कामाचे कार्यादेश मे. अर्जुन अर्थमुव्हर्स यांना देण्यात आलेले असून सदर काम प्रगतीपथावर आहे. सदर कामातील करण्यात आलेल्या Approach Jetty या कामाचे चालू देयक मे. अर्जुन अर्थमुव्हर्स यांना अदा करण्यात आले आहे.

तसेच करंजा Off Shore-(Construction of Pile Jetty) या कामाचे कार्यादेश श्री.आर बी चव्हाण यांना देण्यात आलेले आहे. सदरचे काम प्रगतीपथावर असून अद्यापपर्यंत या कामाचे देयक अदा करण्यात आलेले नाही.

सदर कामाचे देयक योग्य पध्दतीने कंत्राटदारास अदा करण्यात आलेले आहे. त्यामुळे तक्रारीत तथ्य दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील व्यापाऱ्यांनी जकात बुडविल्याबाबत**

**(३७) २३६३५ (११-११-२०१६). श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतून पुढील वर्षी जकात हद्दपार होवून वस्तू व सेवाकर प्रणाली (जीएसटी) येत असताना मागील अनेक वर्षांपासून व्यापाऱ्यांनी थकविलेल्या जकातीच्या वसूलीचा मुद्दा माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ पर्यंत व्यापाऱ्यांनी सुमारे ६३५ कोटी रुपयांची जकात बुडविली असल्याची माहिती महापालिकेच्या लेखा परिक्षा अहवालातून निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन व्यापाऱ्यांकडील थकीत जकात वसूली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-११-२०१६) :** (१) मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ अंतर्गत ताबडतोब निर्यात करावयाच्या प्रयोजनासाठी, मुंबईत आयात केलेल्या वस्तूस निर्धारीत शुल्क भरुन जकात माफी अनुज्ञेय आहे.

आयात केलेल्या वस्तू मुंबईबाहेर ७ दिवसांच्या विहित कालावधीत (१६८ तास) निर्यात केल्याची नोंद जकात कार्यकेंद्रावर करणे आवश्यक असते. अन्यथा सदर मालावर जकातीच्या रकमेची वसुली करण्याकरिता आयातदाराला 'एन' प्रपत्र मागणीपत्र पाठविण्यात येते.

सन २०११ मध्ये 'एन' प्रपत्र सुविधेची रुपये ६३५ कोटी इतक्या रकमेची ८१,२०४ प्रकरणे प्रलंबित होती.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सन २०११ पर्यंत 'एन' प्रपत्र या सुविधेअंतर्गत प्रलंबित असलेल्या एकूण रुपये ६३५ कोटी रकमेच्या ८१,२०४ इतक्या प्रकरणांपैकी रुपये २३८.०५ कोटी रकमेची १९,१७१ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

उर्वरित रुपये ३९८ कोटी रकमेच्या ६२,०३३ प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) महानगरपालिकेमार्फत जकात चुकविण्याच्या प्रकरणांची चौकशी वेळोवेळी करण्यात येते. तसेच, जकात चुकविणाऱ्या, कमी जकात भरणाऱ्या आयातदारांकडून मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ४७८-१ अअ च्या तरतुदींनुसार जकात अधिक जकातीच्या १० पट दंड वसुल करण्यात येतो व ज्याप्रकरणी आयातदार असा दंड भरण्यास तयार होत नाही अशा प्रकरणी आयातदारांविरुध्द संबंधित न्यायालयात कलम ४७८, ४७८-१अ, ४७८-१ब अनुसार दावा दाखल करण्यात येतो.

तसेच प्रलंबित 'एन' प्रपत्र मागणीपत्रे निकाली काढण्याकरिता वेळोवेळी विशेष प्रयत्न करण्यात आलेले आहेत. महानगरपालिकेमार्फत आयातदार/निर्यातदार आणि कस्टमस हाऊस एजंट यांच्या संघटनेबरोबर वेळोवेळी सविस्तर चर्चा करुन मागणीपत्रांचा निपटारा करण्याकरिता प्रयत्न करण्यात आले आहेत.

जकात वसुली तसेच जकातीचा भरणा यांचे सुलभीकरण करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सर्व जकात नाके व जकात कार्यकेंद्रे यांचे संगणकीकरण केलेले आहे. तसेच, ई-पेमेंट व डेबिट अकाऊंट इ. सोयी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुली उपस्थिती भत्यापासून वंचित असल्याबाबत

**(३८) २३६६७ (११-११-२०१६). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींची गळती थांबविण्यासाठी प्रशासनाने उपस्थिती भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला असूनही भत्ता विद्यार्थीनींच्या बँक खात्यात जमा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेकरिता महापालिकेने अर्थसंकल्पात ५ कोटी रुपयांची तरतूद करुनही ही रक्कम जमा करण्यासाठी बँक निश्चिती न झाल्याने ही रक्कम जमा न झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यातील महानगरपालिका शाळेतील विद्यार्थीनींची गळती थांबावी म्हणून देण्यात येणारा भत्ता मुलींना दिला नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आह काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-११-२०१६) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींची गळती थांबविण्यासाठी देण्यात येणाऱ्या उपस्थिती भत्त्यासाठी सन २०१६-१७ साठी रुपये ५,९०,०३,०००/- इतकी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये बँकेची निश्चिती झाल्यानंतर उपस्थिती भत्त्याची रुपये ३,८५,९८,२२२/- इतकी रक्कम १८,००६ पात्र लाभार्थी विद्यार्थीनींच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे.

(३) राज्यातील अन्य महानगरपालिका शाळांमध्ये विद्यार्थीनींना उपस्थिती भत्ता दिला जात नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मालाड (पश्चिम) येथे शाळेसाठी राखीव असलेल्या जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(३९) २३७४४ (११-११-२०१६). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड (पश्चिम) येथे शाळेसाठी राखीव असलेल्या जागेवर सन २००८ मध्ये अनधिकृत बांधकाम करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामाला ८ वर्षे पूर्ण होवून देखील हे बांधकाम पाडण्याचे आदेश दिंडोशी न्यायालयाने महापालिकेला दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेला सदर बांधकाम पाडायचे नसल्याने या प्रकरणातील कागदपत्रेच गहाळ झाल्याची लेखी कबुली महापालिकेच्या पी/उत्तर विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (इमारत आधि कारखाने) यांनी दिली असल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर अनधिकृत बांधकामे, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०८/०२/२००८, ११/०३/२००८ व १८/०३/२००८ रोजी नोटीस देऊन निष्कासित करण्यात आली होती.

त्यानंतर त्याठिकाणी पुन्हा अनधिकृत बांधकाम केल्याचे सन २०१४ मध्ये निदर्शनास आले होते.

(३) सहाय्यक अभियंता (इमारत आणि कारखाने), पी/उत्तर विभाग यांनी माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने अशी माहिती दिली हे खरे आहे.

तथापि, महानगरपालिकेच्या अभिलेखात माहिती उपलब्ध असूनही ती पुरविण्यात आली नाही म्हणून संबंधिताविरुध्द चौकशी प्रस्तावित आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी सन २००८ मधील अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने संबंधित कर्मचाऱ्यांची महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून संबंधितांवर वेतनवाढ/वेतनवाढी रोखणे तसेच दंड आकारण्याच्या शिक्षा बजावण्यात आल्या आहेत.

सदर ठिकाणी सन २०१४ मध्ये आढळून आलेल्या अनधिकृत बांधकामांना महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

तथापि, सदर बांधकामधारकांनी सादर केलेले जनगणना प्रमाणपत्र पडताळण्याबाबत जिल्हाधिकारी (मुंबई उपनगरे) यांच्यामार्फत विनंती करण्यात आली आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या उर्दू उच्च माध्यमिक शाळांमधील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या संगणक प्रयोग शाळेसाठी शासनाने मंजूर केलेला निधी परत गेल्याबाबत**

**(४०) २३८७८ (११-११-२०१६). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या बारा उर्दू उच्च माध्यमिक शाळांमधील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या संगणक प्रयोग शाळेसाठी संगणक खरेदी करण्यासाठी शासनाने मंजूर केलेला २७ लाख १२ हजार रुपयांचा निधी महापालिकेच्या शिक्षण खात्याच्या नामुष्कीमुळे शासनाला परत करावा लागल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेच्या शिक्षण विभागाने हा निधी पुन्हा मिळण्यासाठी काहीच प्रयत्न न केल्यामुळे अल्पसंख्याक विद्यार्थी संगणक प्रशिक्षणापासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शिक्षण उपसंचालकानी महापालिकेच्या शिक्षण अधिकाऱ्यांना आठ स्मरणपत्रे पाठविली असतानाही संगणक खरेदीसाठी मिळालेल्या निधीकडे दुर्लक्ष केल्याने हा निधी परत गेल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार अशा प्रकारे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-११-२०१६) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या आदेशानुसार खात्यांतर्गत संक्षिप्त चौकशीची कारवाई करण्यात येऊन दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर ठपका ठेवण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सुशिक्षित बेरोजगारांच्या भत्त्याच्या रकमेत वाढ करण्याबाबत

**(४१) २३८९१ (११-११-२०१६). ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी बेरोजगार भत्ता देण्याची योजना शासनाने बंद केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांची मोठ्या प्रमाणातील संख्या पाहता बेरोजगारी भत्त्याच्या रकमेत वाढ करण्यात यावी अशी मागणी सुशिक्षित बेरोजगारांच्या संघटनेकडून शासनाकडे वारंवार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुशिक्षित बेरोजगारांच्या भत्त्याच्या रकमेत वाढ करण्याबाबत तसेच त्यांना जनगणनेच्या कामामध्ये सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२९-११-२०१६) :** (१) सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य ही योजना शासनाने सन २००४ मध्ये बंद केली आहे.

(२) बेरोजगारांना बेरोजगारी भत्ता देण्यात यावा याबाबत शासनाकडे मागण्या होत आहेत.

(३) सदर बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### ठाणे व मिरा-भाईंदर शहरांना जोडणाऱ्या बायपास रस्त्याच्या कामाबाबत

**(४२) २४७८५ (११-११-२०१६). श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व मिरा-भाईंदर शहरांना जोडणाऱ्या घोडबंदर रस्त्यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे खाडीस समांतर असा बायपास रस्ता बांधण्याकरीता ८० कोटी रुपयांची निधी मंजूर केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या कामाची सुरुवात करण्यात आली काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम विहीत वेळेत पूर्ण होण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-११-२०१६) :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर रस्त्याच्या कामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्याची प्रक्रिया मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंतिम टप्प्यात आहे. तसेच विषयांकित रस्त्याच्या कामाकरीता भूसंपादन व इतर आवश्यक परवानग्या या विषयाची कार्यवाही मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत प्रगतीपथावर आहे.

---

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) पूर्व द्रुतगती महामार्गावर तीन उड्डाणपुल बांधण्याचा घेतलेला निर्णय**

**(४३) २४७९० (११-११-२०१६). श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) पूर्व द्रुतगती महामार्गावर ठाणे शहरात आनंदनगर, कासारवाडी आणि ओवळा येथे तीन उड्डाणपुल बांधण्याचा निर्णय घेतल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील तीन उड्डाणपुल बांधण्यासाठी आवश्यक असणारा निधी मंजुर करुन सदरील उड्डाण पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-११-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) सदर पूलांच्या बांधकामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.

---

**नागपूर यैथील महानिर्मितीचे ऊर्जा प्रकल्प बंद असल्याबाबत**

**(४४) २५४८३ (१६-१२-२०१६). श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील महानिर्मितीच्या सात ऊर्जा प्रकल्पांपैकी चार प्रकल्प बंद असल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानिर्मितीचा वीज दर खाजगी वीज कंपन्यांपेक्षा महाग असून त्यांच्या वीजेला मागणी नसल्यामुळे महानिर्मितीने सात पैकी चार प्रकल्प बंद ठेवलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानिर्मितीला लागणारा विद्युत निर्मिती खर्च कमी करुन विद्युत दर कमी करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०१-२०१७) :** (१) महावितरण कंपनीकडून राज्याची वीजेची मागणी कमी झाल्यामुळे दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी मेरिट ऑर्डर डीस्पॅच तत्वानुसार खापरखेडा येथील संच बंद ठेवण्यात आले होते.

(२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार मेरिट ऑर्डर डीसपॅच प्रणाली संचांचा अस्थिर आकार/इंधन आकार यानुसार अंमलात येते. महानिर्मितीचे बहुतेक संच कोळसा खाणीपासून दूर असल्यामुळे त्यांच्या व खाजगी वीज निर्मिती केंद्र यांचा अस्थिर आकार/ इंधन आकार यामध्ये तफावत आहे. त्यामुळे मेरिट ऑर्डर डीस्पॅच प्रणालीच्या तत्त्वानुसार महानिर्मितीचे संच महावितरणाच्या सूचनेनुसार बंद ठेवण्यात आले.

(३) वीज निर्मितीसाठी प्रामुख्याने इंधनावर खर्च होतो. सदर खर्च कमी करण्यासाठी औष्णिक विद्युत केंद्राजवळ असणाऱ्या खाणीमधून जास्त कोळसा हा उपलब्ध करुन घेणे, Average Landing Cost कमी असणाऱ्या खाणीतून जास्तीत जास्त कोळसा मागविणे, कोळशाची गुणवत्ता सुधारणेचे प्रयत्न, त्याचप्रमाणे औष्णिक विद्युत केंद्राच्या स्तरावर केंद्राच्या व्यवस्थापन व देखभालीच्या संदर्भात विशेष प्रयत्न करुन केंद्राची efficiency वाढविण्याचे या उपायाने वीज दर कमी करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वेगवेगळ्या विभागातील अधिकारी नियुक्ती**
**अभावी घरी बसून वेतन घेत असल्याबाबत**

**(४५) २५५५१ (०४-०१-२०१७). श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत निवडलेल्या राज्यातील वेगवेगळ्या विभागातील वर्ग एक दर्जाचे १०९ व वर्ग दोनचे २८५ असे ३९४ अधिकारी नियुक्ती अभावी घरी बसून वेतन घेत असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेवून या प्रशिक्षण घेतलेल्या अधिकाऱ्यांना नियुक्तीचे ठिकाण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१७) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तुळजापूर नगरपालिकेत विकास कामात कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४६) २५८८३ (११-११-२०१६). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर नगरपालिकेतील विकास कामात सन २०११-१२ ते सन २०१४-१५ या कालावधीत कोटयवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार लेखा परिक्षणाद्वारे निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार निदर्शनास येऊनही दोषींवर कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यातील दोषी व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-११-२०१६) :** (१) सन २०११-१२ ते २०१४-१५ या आर्थिक वर्षातील लेखापरिक्षण अहवाल कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे नमूद नाही. तथापि, काही बाबीमध्ये अनियमितता झाल्याचे नमूद आहे.
(२) व (३) लेखापरिक्षणाच्या अहवालासंदर्भात सादर केलेल्या अनुपालन अहवालाच्या अनुषंगाने स्थानिक निधी लेखा, उस्मानाबाद यांच्याकडून प्राप्त सूचनाबाबत कार्यवाही सुरु आहे.

लेखापरिक्षण अहवालात गंभीर अनियमिततेची बाब आढळून आल्यास संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी शाळांना मान्यता देणेबाबत**

**(४७) २६०५२ (११-११-२०१६). श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी शाळांना मान्यता देण्याचे शेकडो प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ नियम ११ (४) नुसार तपासणी नंतर १५ दिवसाचे आत नमुना २ मध्ये मान्यतापत्र देण्याची तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरटीई मधील उपरोक्त तरतुदीकडे दुर्लक्ष करून शिक्षणाधिकारी यांनी मागील ६ वर्षापासून मान्यता प्रलंबित ठेवली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ६ वर्षापासून प्रलंबित प्रस्ताव मंजूर करण्याबाबत तसेच शिक्षणाधिकारी व त्यांचे अधिनस्त अधिका-यांविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०१६) :** (१) खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येणाऱ्या व महानगरपालिकेने मान्यता व अनुदान सहाय्यासाठी नोंदणी केलेल्या ९७ शाळांच्या मुदतवाढीचे प्रस्ताव व खाजगी विनाअनुदानित शाळांचे ३८९ प्रस्ताव प्रलंबित आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिका अधिकार क्षेत्रातील खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येणाऱ्या व महानगरपालिकेने मान्यता व अनुदान सहाय्यासाठी नोंदणी देण्यात आलेल्या एकूण ४२७ शाळांपैकी ३३४ शाळांची मान्यता मुदतवाढ दिनांक ३१ मे, २०१५ रोजी संपली आहे. सदर अनुदानित शाळांनी शासनाने विहित केलेली मानके व प्रमाणके यांची पुर्तता न केल्यामुळे या शाळांना मान्यता मुदतवाढ देण्यात आलेली नव्हती.

मुदतवाढ संपलेल्या ३३४ शाळांपैकी २३३ शाळांना शिक्षण समितीच्या मंजुरीने मान्यता मुदतवाढ व अनुदान नोंदणी मुदतवाढ देण्यात आली आहे. सन २०१५-१६ मध्ये ४ शाळा पटसंख्येअभावी बंद झालेल्या आहेत.

मान्यता मुदतवाढ संदर्भातील ७५ शाळांचे प्रस्ताव कार्यान्वित आहेत. आर.टी.ई. कायद्यातील तरतुदीनुसार भौतिक सुविधांची पूर्तता करीत नसल्यामुळे तसेच, महानगरपालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र नसल्यामुळे २२ शाळांच्या मान्यता मुदतवाढीचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

खाजगी विनाअनुदानित ६७२ शाळांपैकी ५३८ शाळांची मुदतवाढ दिनांक ३१ मे, २०१५ रोजी संपलेली आहे.

५३८ शाळांपैकी २९ शाळांना, त्या सर्व निकषांची पूर्तता करीत असल्याने मान्यता मुदतवाढ देण्यात आली आहे. १२० शाळांचे प्रस्ताव मान्यता मुदतवाढीसाठी कार्यान्वित आहेत.

तसेच, ३८९ शाळा आर.टी.ई. कायद्यातील निकषांनुसार पूर्तता करीत नसल्यामुळे व महानगरपालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र नसल्यामुळे या शाळांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(४) व (५) सदर शाळांकडे प्रलंबित असलेले प्रस्ताव त्यांनी आर.टी.ई. कायद्यातील तरतुदीनुसार सर्व निकषांची पूर्तता करुन सादर केल्यास या शाळांना महानगरपालिकेच्या शिक्षण समितीच्या मंजुरीने मान्यता मुदवाढ देण्यात येणार आहे.

---

**बारशीव (ता.मुरुड, जि.रायगड) येथे सीआरझेडच्या नियमाचे झालेले उल्लंघन**

**(४८) २६०९४ (११-११-२०१६). श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारशीव (ता.मुरुड, जि.रायगड) येथे सीआरझेडच्या नियमाचे उल्लंघन करुन समुद्रालगतच्या ३० मीटर अंतर्गत बांधकाम केल्याप्रकरणी एकावर रेवदंडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्याही शासकीय कार्यालयाची पूर्व परवानगी न घेताच समुद्रालगत ३० मीटर अंतर्गत सीआरझेड क्षेत्रात जवळपास २२६७.५५ चौ.मी.चे पक्क्या सिमेंट विटांचे आर.सी.सी. बांधकाम असलेले पक्के घर बांधून पूर्ण होईपर्यंत संबंधित विभागाने वा यंत्रणेने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सागरी सुरक्षेचा विचार करता सीआरझेड हद्दीत पक्के बांधकाम होईपर्यंत दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-११-२०१६) :** (१) हे खरे आहे.

बारशीव ता.मुरुड या गावी समुद्र किनाऱ्यापासून ३० मीटरच्या आत सीआरझेड क्षेत्रात बांधकाम केल्याचे तहसिलदार, मुरुड यांचे तक्रारीवरुन एका आरोपीविरुध्द रेवदांडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ८८/२०१६ महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३, ५४, ५५ सह भारतीय पर्यावरण अधिनियम कलम ३(१), १५ प्रमाणे दिनांक २८/०७/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

सदरचे बांधकाम चालू असतानाच संबंधित बांधकामधारकावर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याने सद्यस्थितीत बांधकाम बंद व अपूर्ण अवस्थेत आहे. त्यामुळे सदर प्रकरणी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नगरपरिषद सिंदी (रेल्वे) (जि.वर्धा) च्या सन २०१३-१४ मध्ये लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपाबाबत**

**(४९) २६२८३ (२१-११-२०१६). श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपरिषद सिंदी (रेल्वे) (जि.वर्धा) च्या सन २०१३-१४ मध्ये लेखापरिक्षण अहवालात गंभीर स्वरुपाचे आक्षेप नोंदविण्यात आले असून त्याबाबत स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.नगरविकास राज्यमंत्री व प्रधान सचिव, नगरविकास यांना माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लेखापरिक्षण अहवालाच्या पृष्ठ क्र.१२ वर आक्षेप क्रमांक ६ रेस्ट हाऊस ते रेल्वे स्टेशनपर्यंत सिमेंटचा रस्ता बांधकाम करणे हे दहा लाखापेक्षा अधिक किंमतीचे काम असताना ई-निविदा काढणे आवश्यक असताना सुध्दा ई-निविदेने काम न देता लिफापा पध्दतीने काम देण्यात आल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे ज्या ठेकेदाराला काम देण्यात आले आहे, त्या ठेकेदाराचे काम करण्याची नोंदणी प्रमाणपत्रानुसार क्षमता १५ लाख असताना सुध्दा त्याला २७ लाखाचे काम देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर लेखापरिक्षण अहवालात आक्षेप असतांनासुध्दा विद्यमान अध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांनी सदर रस्त्याची सुरक्षा ठेव काढली आहे तसेच सन २०१३-१४ मध्ये लेखापरिक्षण अहवालात आलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने दिनांक २४ एप्रिल, २०१६ रोजी पोलीस अधिक्षक, ॲन्टीकरप्शन ब्युरो, नागपूर यांना झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करुन कार्यवाही करण्यासंदर्भात तक्रार दिली, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०१६) :** (१), (२) व (३) सन २०१३-१४ मधील लेखा परिक्षणात लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

सन २०१३-१४ मधील लेखापरिक्षण अहवालात आक्षेप प्राप्त होण्यापूर्वी ठेकेदाराची सुरक्षा राशी नगरपरिषदेकडून परत करण्यात आली आहे.

ॲन्टीकरप्शन ब्युरोकडून या संदर्भात अद्यापही नगरपरिषद, जिल्हाधिकारी तसेच विभागाकडे तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांची पुर्तता नगरपरिषदेमार्फत अनुपालन अहवालाद्वारे करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला शहरातील भूमिगत गटार योजनेच्या सुधारीत प्रस्तावाबाबत**

**(५०) ४८९३५ (०३-०७-२०१४). श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ३३३८१ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला महानगरपालिकेचा महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून भुमिगत गटार योजनेचा प्रकल्प ओळखला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाने सन २००७ मध्ये १३८ कोटी रु. या योजनेकरिता मंजुर केले, हे खरे आहे काय,
(३) सन २००९ मध्ये भुमिगतची निविदा नियमबाहय रितीने राबविण्यात आल्याने मा.मुख्यमंत्र्यांनी योजनेची निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय,
(४) मा.उपमुख्यमंत्र्यांनी शहरासाठी १०० एम.एल.डी. प्लॅन्टची आवश्यकता नसल्याचे सांगत ६५ एम.एल.डी. प्लॅन्टसाठी नव्याने प्रकल्प अहवाल तयार करण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय,
(५) सदरहू प्रकल्प अहवाल तयार करण्याचे कंत्राट मे.युनिटी कन्सल्टंटला देण्यात आले, हे खरे आहे काय,
(६) मनपा अधिका-यांकडून सत्तापक्षाची दिशाभूल करण्यात आल्याने योजनेचा आराखडा स्पष्ट नसतांना देखील ही योजना प्रशासन राबवित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी योजने अंतर्गत रुपये १३२.७५ कोटीच्या अकोला शहर भुमिगत गटार योजनेस सन २००७ मध्ये केंद्र शासनाने मान्यता दिली आहे.
(३) अकोला महानगरपालिकेने सदर प्रकल्पासाठी राबविलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये झालेल्या अनियमिततेमुळे सदर प्रकल्पाचा निविदा स्वीकृतीचा व मोबिलायझेशन ॲडव्हान्स देणेबाबतचा ठराव शासनाने सन २०१२ मध्ये विखंडीत केला आहे.
(४) अकोला शहरासाठी युआयडीएसएसएमटी अंतर्गत मंजूर भुयारी गटार योजनेच्या तांत्रिक आराखड्यामध्ये आवश्यक सुधारणा करुन त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक मान्यता देणेबाबत निदेश तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री यांनी जानेवारी, २०१३ मध्ये दिले होते.

(५) होय, हे खरे आहे.
(६) व (७) या दरम्यान मार्च, २०१४ अखेर युआयडीएसएसएमटी अभियान संपुष्टात आलेने सदर प्रकल्प युआयडीएसएसएमटी योजनेतून रद्द करुन अमृत अभियानातून राबविण्यात येणार आहे.

---

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.